## MAHARASHTRA ACT No. XXXVII OF 1964.

## MAHARASHTRA VACCINATION ACT, 1964.

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक २८ सप्टेंबर १९६४ रोजी मिळालेली असल्यामुळे तो याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XXXVII OF 1964.

**AN ACT TO CONSOLIDATE AND AMEND THE LAW RELATING TO VACCINATION, AND TO PROVIDE FOR COMPULSORY VACCINATION, AND REVACCINATION, IN THE STATE OF MAHARASHTRA.**

## सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७.

[ राष्ट्रपती याची संमती मिळाल्यानंतर " महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात " दिनांक १ ऑक्टोबर १९६४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

**महाराष्ट्र राज्यात, देवीची लस टोचण्यासंबंधी असलेला कायदा एकत्रित करून त्यात दुरुस्ती करणे, आणि सक्तीने देवीची लस टोचण्यासाठी व पुन्हा देवीची लस टोचण्यासाठी तरतूद करणे याबाबत अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात देवीची लस टोचण्यासंबंधी असलेला कायदा एकत्रित करून त्यात दुरुस्ती करणे, आणि सक्तीने देवीची लस टोचण्यासाठी व विवक्षित परिस्थितीत पुन्हा सक्तीने देवीची लस टोचण्यासाठी तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंधराव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### विभाग १

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास महाराष्ट्राचा देवीची लस टोचण्याबाबत अधिनियम, १९६४, असे म्हणावे. लघु संज्ञा, व्याप्ती आणि प्रारंभ.

(२) तो, सबंध महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य सरकार, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील, त्या तारखेस अंमलात येईल.

अधिनियमाची अंमल-बजावणी तहकूब करण्याची शक्ती.

२. राज्य सरकारास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, तीत निर्दिष्ट करण्यात येईल त्या मुदतीपर्यंत, सबंध राज्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात, ह्या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही उपबंधांची अंमलबजावणी तहकूब ठेवण्याचा अधिकार आहे.

व्याख्या.

३. संदर्भाविरुद्ध अन्यथा अर्थ लावणे आवश्यक नसेल तर, ह्या अधिनियमात—

(अ) "प्रौढ इसम" या संज्ञेचा अर्थ, जो मूल नाही असा कोणताही इसम, असा समजावा;

(ब) "जनावराची लस" या संज्ञेचा अर्थ, राज्य सरकारने ह्या बाबतीत निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही जनावरापासून घेतलेली देवीची लस असा समजावा;

(क) "नेमलेला दिवस" या संज्ञेचा अर्थ, ज्या तारखेस हा अधिनियम अंमलात येईल ती तारीख असा समजावा;

(ड) "मुख्य अधीक्षक, लस-टोचणी" किंवा "मुख्य अधीक्षक" या संज्ञेचा अर्थ, कलम ४ अन्वये नेमलेला किंवा नेमण्यात आल्याचे समजण्यात येणारा मुख्य अधीक्षक असा समजावा;

(ई) "मूल" या संज्ञेचा अर्थ, ज्याच्या वयास अठरा वर्षे पूर्ण झालेली नाहीत असा इसम, असा समजावा;

(फ) "पालक" या संज्ञेचा अर्थ, कोणत्याही मुलाचा सांभाळ करण्याचे, त्याचे पालन-पोषण करण्याचे किंवा त्यास अभिरक्षेत ठेवण्याचे काम विधिअन्वये किंवा स्वाभाविक हक्कान्वये किंवा मान्यता पावलेल्या अशा रिवाजान्वये ज्या इसमावर पडले असेल किंवा ज्याने कोणत्याही मुलांचा सांभाळ, पालनपोषण किंवा अभिरक्षा करण्याचे काम स्वीकारले असेल किंवा स्वतःकडे घेतले असेल किंवा कोणत्याही मुलांचा सांभाळ करण्याचे किंवा त्यास अभिरक्षेत ठेवण्याचे काम, ज्या इसमाकडे या बाबतीत वैधरीत्या अधिकार दिलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने सोपविलेले असेल, असा कोणताही इसम, असा समजावा;

(ग) "आईबाप" या संज्ञेचा अर्थ, औरस मुलाच्या बाबतीत, त्याचे वडील किंवा आई आणि अनौरस मुलाच्या बाबतीत फक्त त्याची आई, असा समजावा;

(ह) "विहित" म्हणजे नियमांद्वारे विहित केलेले;

(आय्) "सार्वजनिक लस टोचक" या संज्ञेचा अर्थ, कलम ६ अन्वये नेमलेला कोणताही देवीची लस टोचणारा असा समजावा;

(जे) "नोंदविलेला वैद्यक व्यवसायी" या संज्ञेचा अर्थ,—

(१) मुंबई वैद्यक अधिनियम, १९१२;

(२) मध्यप्रांत व वऱ्हाडचा वैद्यक व्यवसाय करणारांच्या नोंदणीबाबत अधिनियम, १९१६;

(३) वैद्यक व्यवसाय करणारांच्या नोंदणीबाबत अधिनियम;

(४) भारतीय वैद्यक परिषद अधिनियम, १९५६; किंवा

(५) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१,

याअन्वये नोंदलेला किंवा नोंदणी झाल्याचे समजण्यात येणारा आणि उक्त अधिनियमाच्या (१९६१ चा अधिनियम) अनुसूचीच्या भाग अ, ब किंवा ड मध्ये निर्दिष्ट केलेल्या पात्रतांपैकी कोणतीही पात्रता धारण करणारा वैद्यक व्यवसायी, असा समजावा;

(के) "निबंधक, जन्म-नोंदणी" किंवा "निबंधक" या संज्ञेचा अर्थ,—

(एक) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधिअन्वये, किंवा

(दोन) ज्याचा विधिप्रमाणेच अंमल आहे अशा कोणत्याही उप-विधिअन्वये किंवा नियमान्वये, जन्म नोंदणी करणे हे ज्याचे कर्तव्य आहे असा कोणताही अधिकारी, किंवा इतर इसम किंवा प्राधिकारी असा समजावा;

(ल) "नोंदणीपुस्तक" आणि "नोंदणी" म्हणजे खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेला कोणताही विधी, उप-विधी किंवा नियम यानुसार असलेले नोंदणीपुस्तक किंवा केलेली नोंदणी ;

(म) "पुन्हा देवीची लस टोचणे" ह्या संज्ञेचा अर्थ, ज्यास पूर्वी यशस्वीरीत्या देवीची लस टोचण्यात आली होती अशा इसमास देवीची लस टोचणे असा समजावा ;

(न) "नियम" म्हणजे कलम ३४ अन्वये केलेले नियम ;

(ओ) "लस टोचणी अधीक्षक" किंवा "अधीक्षक" ह्या संज्ञेचा अर्थ, कलम ७ अन्वये असा अधीक्षक म्हणून नेमलेला अधिकारी असा समजावा :

परंतु, देवीची लस टोचण्याच्या एखाद्या क्षेत्रात, अधीक्षकाची नेमणूक करण्यात आली नसेल तर, कलमे २२ व २४ यातील अधीक्षकासंबंधातील उल्लेख हे अशा देवीची लस टोचण्याच्या क्षेत्रासाठीच्या मुख्य अधीक्षकासंबंधातील उल्लेख आहेत असे समजले पाहिजे ;

(प) "असंरक्षित मूल" किंवा "असंरक्षित प्रौढ इसम" या संज्ञांचा अर्थ,—

(एक) ज्यास स्वाभाविकपणे किंवा लस टोचण्यात आल्यावर देवी आल्या नव्हत्या ; किंवा

(दोन) ज्यास यशस्वीरीत्या देवीची लस टोचण्यात आली नव्हती ; किंवा

(तीन) ह्या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिअन्वये ज्यास, देवीची लस टोचण्याचा परिणाम होत नसल्याबद्दल प्रमाणित करण्यात आले नसेल किंवा अशा रीतीने प्रमाणित केल्याचे समजण्यात येत नसेल,—

असे मूल किंवा प्रौढ इसम, असा समजावा ;

(क्यू) "लस टोचणी विभाग" किंवा "विभाग" या संज्ञेचा अर्थ, देवीची लस टोचण्याच्या क्षेत्राची कलम ५ अन्वये ज्या विभागात विभागणी करण्यात आली आहे त्या विभागांपैकी एक विभाग, असा समजावा ;

(र) "लस टोचणी केंद्र" किंवा "केंद्र" या संज्ञेचा अर्थ, कलम ५ अन्वये स्थापन केलेले देवीची लस टोचण्याचे केंद्र, असा समजावा ;

(स) "देवीची लस टोचणारा" या संज्ञेचा अर्थ,—

(एक) मुख्य अधीक्षक, लस टोचणी याने कलम ६ अन्वये नेमलेला सार्वजनिक लस टोचक ;

(दोन) नोंदविलेला वैद्यक व्यवसायी ; किंवा

(तीन) कलम ९ अन्वये ज्यास देवीची लस टोचण्यासाठी अनुज्ञप्ती देण्यात आली आहे असा वैद्यक व्यवसायी ;

असा समजावा.

## विभाग २

### सेवकवर्ग.

४. (१) नेमलेल्या दिवसापासून,— मुख्य अधीक्षक, लस टोचणी, याची नेमणूक आणि त्यांच्या नियंत्रणाखाली लस टोचण्याची क्षेत्रे.

(अ) (एक) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीच्या संबंधात, बृहन्मुंबई नगरपालिका आयुक्त,

(दोन) मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ अन्वये रचना करण्यात आलेल्या एखाद्या शहराच्या महानगरपालिकेच्या हद्दींच्या संबंधात, त्या शहराचा नगरपालिका आयुक्त,

(तीन) नागपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दींच्या संबंधात, नागपूर शहर नगरपालिका आयुक्त,

(चार) एखाद्या जिल्हा परिषदेच्या हद्दींच्या संबंधात, त्या जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी, आणि

(पाच) एखादी बरो नगरपालिका, जिल्हा नगरपालिका, शहर समिती, किंवा अधिसूचित क्षेत्र समिती यांच्या हद्दीच्या संबंधात, संबंधित स्थानिक प्राधिकारी संस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी (मग तो कोणत्याही नावाने ओळखण्यात येवो),

यांची या अधिनियमाच्या कारणांकरिता मुख्य अधीक्षक, लस टोचणी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे असे समजले पाहिजे; आणि

(ब) छावणी मंडळाच्या हद्दीच्या संबंधात, राज्य सरकार, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, तीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा इसमाची या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता मुख्य अधीक्षक, लस टोचणी म्हणून नेमणूक करील.

(२) उपरोक्त अधिकाऱ्यांच्या आपापल्या क्षेत्राधिकाराखालील स्थानिक क्षेत्रे ही, संबंधित मुख्य अधीक्षकांच्या नियंत्रणाखालील देवीची लस टोचण्याची क्षेत्रे म्हणून समजण्यात आली पाहिजेत.

**देवीची लस टोचण्याच्या क्षेत्राची विभागणी आणि सार्वजनिक देवीची लस टोचण्याचे केंद्र स्थापन करणे.**

५. (१) ह्या बाबतीत केलेल्या नियमांस अधीन राहून, प्रत्येक देवीची लस टोचणाऱ्यांच्या मुख्य अधीक्षकाने, आपल्या नियंत्रणाखालील देवीची लस टोचण्याच्या क्षेत्राची, त्यास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे, देवीची लस टोचण्याच्या विभागात विभागणी केली पाहिजे, आणि प्रत्येक विभागात त्यास आवश्यक वाटेल इतक्या ठिकाणी आवश्यक वाटेल तेवढ्या सार्वजनिक लस टोचणी केंद्रांची स्थापना केली पाहिजे.

(२) प्रत्येक विभागाच्या सीमा आणि अशा प्रकारे स्थापन केलेल्या सार्वजनिक लस टोचणीच्या प्रत्येक केंद्राची जागाही, वेळोवेळी, विहित केलेल्या रीतीने अधिसूचित करण्यात आली पाहिजे.

**सार्वजनिक देवीची लस टोचणाऱ्यांची नेमणूक.**

६. (१) मुख्य अधीक्षकाने देवीची लस टोचण्याच्या प्रत्येक केंद्रासाठी, त्यास आवश्यक वाटतील इतक्या सार्वजनिक लस टोचकांची नेमणूक केली पाहिजे, आणि प्रत्येक केंद्रात त्यांच्या उपस्थितीसाठी त्याने निश्चित केलेले दिवस व वेळा विहित केलेल्या रीतीने अधिसूचित केल्या पाहिजेत.

(२) विहित करण्यात येईल अशी पात्रता, किंवा प्रमाणपत्र असल्याशिवाय किंवा विहित करण्यात येतील अशा शर्ती पुऱ्या करीत असल्याशिवाय, कोणत्याही इसमाची सार्वजनिक लस टोचक म्हणून नेमणूक करता कामा नये.

**देवीची लस टोचणाऱ्यांच्या अधीक्षकांची आणि सहाय्यक अधीक्षकांची नेमणूक.**

७. (१) मुख्य अधीक्षकास, त्यास आवश्यक वाटेल तर, अधीक्षक, देवीची लस टोचणी यांची आणि तसेच, अशा अधीक्षकांच्या नियंत्रणाखाली जितके विभाग ठेवणे त्यास योग्य वाटेल तितक्या विभागांतील सार्वजनिक देवीची लस टोचणाऱ्यांच्या सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवण्याच्या व त्यांची पाहणी करण्याच्या कारणाकरिता अशा अधीक्षकांना सहाय्य करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील इतक्या देवीची लस टोचणाऱ्यांच्या सहाय्यक अधीक्षकांची नेमणूक करण्याचा अधिकार आहे ; आणि राज्य सरकारने तसे फर्माविले असेल तर, मुख्य अधीक्षकाने अशा नेमणुकी केल्या पाहिजेत.

(२) प्रत्येक अधीक्षक आणि सहाय्यक अधीक्षक याने ह्या अधिनियमान्वये किंवा तदनुसार विहित करण्यात येतील अशी किंवा मुख्य अधीक्षक वेळोवेळी फर्मावील अशी कर्तव्ये पार पाडली पाहिजेत.

**सार्वजनिक देवीची लस टोचणाऱ्याने त्याच्या विभागातच राहिले पाहिजे.**

८. मुख्य अधीक्षकाने इतरत्र राहण्यास खास परवानगी दिली असेल ते खेरीजकरून, प्रत्येक सार्वजनिक लस टोचक याने, ज्या विभागासाठी त्याची नेमणूक करण्यात आली असेल त्या, देवीची लस टोचण्याच्या विभागातच राहिले पाहिजे आणि त्याने त्याचे नाव व त्यापुढे आणखी देवीची लस टोचण्याच्या विभागांचा "सार्वजनिक लस टोचक" हे शब्द त्याच्या राहत्या घराच्या आणि त्याच्या विभागातील प्रत्येक लस टोचण्याच्या सार्वजनिक केंद्राच्या, बाहेरील दरवाजावरील किंवा त्याच्या जवळील ठळक ठिकाणी लावले पाहिजे.

९. मुख्य अधीक्षक, लस टोचणी, यास या बाबतीत केलेल्या नियमांस अधीन राहून, आणि विवक्षित अर्ज करण्यात आल्यावर व विहित केलेली फी दिल्यानंतर, नोंदविलेल्या वैद्यक व्यवसायीव्यतिरिक्त वैद्यक इतर वैद्यक व्यवसायीस, विहित केलेल्या नमुन्यात देवीची लस टोचणाऱ्यांसाठी अनुज्ञप्ती देण्याचा व्यवसायींना अधिकार आहे. देवीची लस टोचणाऱ्या- साठी अनुज्ञप्ती देणे.

## विभाग ३

## देवीची लस टोचणे व पुन्हा देवीची लस टोचणे.

### देवीची लस टोचणे.

१०. (१) ज्यास यशस्वीरीत्या देवीची लस टोचण्यात आली नाही अशा प्रत्येक असंरक्षित असंरक्षित प्रौढ इसमाने,— प्रौढ इसम

(अ) जर तो नेमलेल्या दिवशी, देवीची लस टोचण्याच्या क्षेत्रांच्या हद्दीत राहत असेल तर, आणि मुले उक्त दिवसानंतर सहा महिन्यांच्या आत (किंवा राज्य सरकार राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निर्दिष्ट यांस देवीची करील अशा एकूण बारा महिन्यांहून अधिक नसणाऱ्या मुदतीच्या आत), आणि लस टोचणे.

(ब) जर तो नेमलेल्या दिवसानंतर अशा कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करील तर, उक्त क्षेत्रात त्याने प्रवेश केल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांची मुदत किंवा खंड (अ) मध्ये उल्लेखिलेली मुदत—यांपैकी जी नंतरची असेल त्या मुदतीच्या आत,—

देवी टोचणाऱ्याकडून स्वतःस देवीची लस टोचून घेतली पाहिजे ;

(२) ज्याला यशस्वीरीत्या देवीची लस टोचण्यात आली नसेल आणि जे देवीची लस टोचण्याच्या क्षेत्रात जन्मले असेल किंवा त्यास अशा क्षेत्रात तात्पुरते किंवा कायमचे राहण्यासाठी म्हणून आणिले असेल अशा असंरक्षित मुलाच्या आई-बापाने (किंवा असे मूल पालकाच्या ताब्यात असेल तर त्या मुलाच्या पालकाने) ते मूल, यात यापुढे निर्दिष्ट केलेल्या संबंधित मुदतीच्या आत, त्यास देवीची लस टोचून घेण्यासाठी देवीची लस टोचणाऱ्याकडे नेणे किंवा नेण्याची व्यवस्था करणे हे अशा आई-बापांचे (किंवा अशा पालकाचे) कर्तव्य असेल ; अशी संबंधित मुदत पुढीलप्रमाणे असेल :—

(अ) नेमलेल्या दिवशी, उक्त हद्दीच्या आत राहत असलेल्या मुलाच्या बाबतीत,—

(एक) अशा दिवशी ते मूल तीन महिन्यांहून कमी वयाचे असेल तर, त्याच्या जन्माच्या दिवसापासून सहा महिन्यांचे आत, अथवा

(दोन) अशा दिवशी ते मूल तीन महिन्यांचे किंवा तीन महिन्यांपेक्षा अधिक वयाचे असेल तर, अशा दिवसापासून तीन महिन्यांचे आत ;

(ब) नेमलेल्या दिवसानंतर, उक्त हद्दीत आणलेल्या मुलाच्या बाबतीत,—

(एक) ते मूल तीन महिन्यांहून कमी वयाचे असेल तर, त्याच्या जन्माच्या दिवसापासून सहा महिन्यांचे आत, अथवा

(दोन) ते मूल तीन महिन्यांचे किंवा तीन महिन्यांपेक्षा अधिक वयाचे असेल तर, उक्त हद्दीत ते आणल्यापासून तीन महिन्यांचे आत ;

(क) नेमलेल्या दिवसानंतर उक्त हद्दीत जन्मलेल्या मुलाच्या बाबतीत, अशा मुलाच्या जन्मानंतर सहा महिन्यांचे आत.

११. (१) एखाद्या मुलास देवीची लस टोचण्याच्या कारणासाठी म्हणून लस टोचकाकडे एखाद्या आणण्यात येईल किंवा अशा मुलास लस टोचण्यासाठी म्हणून देवी टोचणारा इसम त्याच्या घरी असंरक्षित जाईल तेव्हा, देवी टोचणाऱ्या इसमाने, अशा मुलास यापूर्वीच स्वाभाविकरीत्या किंवा लस टोचल्या- मुलास लस मुळे देवी आल्या होत्या किंवा नाही याविषयी प्रथम खात्री करून घेतली पाहिजे, आणि त्या टोचण्या-

साठी आणले जाईल तेव्हा देवी टोचणाऱ्याने करावयाची उपाययोजना.

मुलास यापूर्वीच देवी आल्या होत्या याबाबत त्याची खात्री झाल्यावर, त्याने लस टोचण्याच्या क्रियेचा योग्य तो परिणाम न होण्यासारखे असल्याबद्दलचे, आपली सही असलेले, विहित केलेल्या नमुन्यातील, एक प्रमाणपत्र अशा मुलाच्या आईबापांस किंवा पालकास, ताबडतोब दिले पाहिजे ; आणि त्यानंतर अशा मुलाच्या आईबापांस किंवा पालकास त्या मुलास देवी काढून घेण्याची व्यवस्था करणे आवश्यक असणार नाही.

(२) जर मुलास पूर्वीच देवी येऊन गेल्या नसतील तर, देवी टोचणाऱ्याने त्या मुलाची तपासणी केली पाहिजे ; आणि अशा रीतीने तपासणी केल्यावर, त्याच्या मते,—

(अ) असे मूल आरोग्याच्या दृष्टीने, देवीची लस टोचण्यास योग्य अशा स्थितीत असेल तर, त्याने या अधिनियमान्वये किंवा तदनुसार विहित केलेल्या शर्तींना-अधीन राहून, शक्य तितक्या लवकर, त्या मुलास अशी लस टोचली पाहिजे ; अथवा

(ब) असे मूल आरोग्याच्या दृष्टीने देवीची लस टोचण्यास योग्य अशा स्थितीत नसेल तर, त्याने, आपल्या सहीनिशी, असे मूल अशी लस टोचण्यास अयोग्य असल्याबद्दलचे विहित केलेल्या नमुन्यातील प्रमाणपत्र अशा मुलाच्या आई-बापांस किंवा पालकास ताबडतोब दिले पाहिजे.

(३) देवीची लस टोचण्यास अयोग्य असल्याबद्दलचे उपरोक्त प्रमाणपत्र हे, ज्या तारखेस ते स्वाधीन करण्यात आले असेल त्या तारखेपासून फक्त दोन महिने अंमलात राहील, परंतु, असे मूल आरोग्याच्या दृष्टीने देवीची लस टोचण्यास अयोग्य अशा स्थितीत असण्याचे चालू असेल तर, असे प्रमाणपत्र दोन महिन्यांच्या लागोपाठ मुदतीने नवीन करून घेता येईल. यथास्थिति अशा प्रमाणपत्राची किंवा नवीन करून घेतलेल्या प्रमाणपत्राची मुदत समाप्त झाल्याच्या तारखेस किंवा तत्पूर्वी आई-बापाने किंवा पालकाने असे मूल देवी टोचणाऱ्याकडे नेले पाहिजे किंवा असे मूल त्याजकडे नेण्याची व्यवस्था केली पाहिजे आणि देवी टोचणाऱ्याने, त्या मुलाची पुन्हा तपासणी केली पाहिजे, आणि असे मूल आरोग्याच्या दृष्टीने, देवीची लस टोचण्यास योग्य अशा स्थितीत नसेल तर, देवी टोचणाऱ्याने अशा प्रमाणपत्राचे आणखी दोन महिन्यांचे मुदतीसाठी नवकरण केले पाहिजे ; अन्यथा त्याने, अशा मुलास, शक्य तितक्या लवकर, अशी लस टोचली पाहिजे.

स टोचल्या-तर पाहणी रणे व लस चण्याची क्या यशस्वी ल्याच्या बतीत णखी ाययोजना णे.

१२. (१) जेव्हा एखाद्या लस टोचकाने एखाद्या मुलास देवीची लस टोचली असेल तेव्हा त्याने, त्या मुलाच्या आई-बापांस किंवा पालकास, विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील एक ज्ञापन दिले पाहिजे आणि अशा ज्ञापनाद्वारे, त्याने त्या मुलाच्या आई-बापांस किंवा पालकास, ज्या दिवशी त्या मुलास अशी लस टोचण्याची क्रिया करण्यात आली असेल त्या दिवसाच्या लगतपुढील आठवड्यातील त्याच दिवशी, वाजवी वेळी त्या मुलाची तपासणी करण्याच्या व देवीची लस टोचण्यात आल्यानंतर त्याजवर झालेल्या परिणामाची खात्री करून घेण्याच्या कारणाकरिता, असे मूल त्याजकडे आणण्याविषयी फर्माविले पाहिजे.

(२) अशा रीतीने तपासणी केल्यावर, लस टोचण्याची क्रिया यशस्वी झाली आहे अशी देवी टोचणाऱ्याची खात्री झाली असेल तर, त्याने देवीची लस टोचण्याची क्रिया यशस्वी झाल्याबद्दलचे विहित करण्यात आलेल्या नमुन्यातील एक प्रमाणपत्र मुलाच्या आई-बापांस किंवा पालकास दिले पाहिजे.

(३) अशा रीतीने पाहणी केल्यावर, देवीची लस टोचण्याची क्रिया यशस्वी झालेली नाही अशी त्याची खात्री झाली असेल तर, (मुलाच्या) अशा आई-बापाने किंवा पालकाने अशा मुलास पुन्हा अशी लस टोचण्याविषयी लस टोचकाने निदेश दिला असल्यास, त्याप्रमाणे त्या मुलास ताबडतोब पुन्हा लस टोचून घेण्याची व्यवस्था केली पाहिजे ; आणि त्यानंतर पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यरीती दुसऱ्यांदा अनुसरण्यात आली पाहिजे.

(४) लस टोचण्याची क्रिया दुसऱ्या वेळी अयशस्वी झाली असेल तर, त्या प्रसंगी पोट-कलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेली कार्यरीती तिसऱ्यांदा आणि अखेरच्या वेळी अनुसरण्यात आली पाहिजे.

(५) एखाद्या मुलाच्या बाबतीत देवीची लस टोचण्याची क्रिया ही तिसऱ्या वेळी अयशस्वी झालेली आहे आणि अशा मुलावर देवी टोचण्याचा यशस्वी परिणाम होत नाही असे लस टोचकास दिसून

येईल तर, त्याने अशा मुलाच्या आई-बापास किंवा पालकास, त्या मुलावर अशी लस टोचण्याचा यशस्वी परिणाम होत नसल्याबद्दलचे एक प्रमाणपत्र दिले पाहिजे; असे प्रमाणपत्र विहित केलेल्या नमुन्यात असले पाहिजे व त्यावर देवी टोचणाऱ्याने आपली सही केली पाहिजे; आणि त्यानंतर, अशा मुलाच्या आई-बापांस किंवा पालकास, त्या मुलास देवीची लस टोचून घेण्याची व्यवस्था करणे आवश्यक असणार नाही.

**सार्वजनिक लस टोचकास मुलाच्या निवासस्थानी बोलाविता येईल.**

१३. जर एखादे मूल त्यास देवीची लस टोचण्यासाठी किंवा त्याची पाहणी करण्यासाठी म्हणून सार्वजनिक लस टोचणी केंद्रात नेण्यास आरोग्याच्या दृष्टीने योग्य अशा स्थितीत नसेल किंवा त्याचे आई-बाप किंवा पालक ही त्यास अशी लस टोचून घेण्यासाठी किंवा त्याची पाहणी करण्यासाठी सार्वजनिक लस टोचणी केंद्रात जाण्यास आरोग्याच्या दृष्टीने योग्य अशा स्थितीत नसतील तर, विहित करण्यात येईल अशी फी दिल्यावर, अशा आई-बापांस किंवा पालकास, यथास्थिति, अशा मुलास देवीची लस टोचण्याच्या किंवा त्याची पाहणी करण्याच्या कारणासाठी म्हणून सार्वजनिक लस टोचकास अशा मुलाच्या निवासस्थानी हजर राहण्यास भाग पाडण्याचा अधिकार असेल.

**देवीची लस टोचण्याच्या कारणासाठी म्हणून असंरक्षित प्रौढ इसमांना-सुद्धा कलमे ११, १२ आणि १३ लागू असतील.**

१४. असंरक्षित प्रौढ इसमांना देवीची लस टोचण्याच्या कारणासाठी म्हणून कलमे ११, १२ व १३ यांचे उपबंध आवश्यक त्या फेरफेरांनिशी लागू होतील; परंतु त्या उपबंधाचे पालन करण्यास संबंधित प्रौढ इसम स्वतः जबाबदार राहील आणि त्याचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करण्यात आल्यास तो स्वतः शिक्षेस पात्र होईल.

## साथ चालू असताना देवीची लस टोचणे किंवा पुन्हा लस टोचणे.

**जेव्हा जेव्हा देवीच्या साथीचा प्रादुर्भाव होण्याचा धोका असेल तेव्हा तेव्हा, निर्दिष्ट केलेल्या मुदतीत यथास्थिति देवीची लस टोचून घेणे किंवा पुन्हा लस टोचून घेणे.**

१५. (१) कोणत्याही स्थानिक क्षेत्रात देवीच्या साथीचा प्रादुर्भाव झालेला आहे किंवा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण झाला आहे अशी कोणत्याही वेळी राज्य सरकारची खात्री झाली असेल तर, राज्य सरकारास, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, असे क्षेत्र 'सक्तीचे देवी-संरक्षण क्षेत्र' म्हणून जाहीर करण्याचा अधिकार आहे.

(२) असा जाहीरनामा अंमलात असताना प्रत्येक प्रौढ इसमाने स्वतःस, आणि, सहा महिन्यांपेक्षा अधिक वय असलेल्या प्रत्येक मुलाच्या बाबतीत, अशा क्षेत्रात राहणाऱ्या किंवा प्रवेश करणाऱ्या त्याच्या आई-बापाने किंवा पालकाने त्या मुलास, अशा अधिसूचनेत निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीच्या आत या अधिनियमाच्या उपबंधानुसार यथास्थिति (असंरक्षित असल्यास) देवीची लस टोचून घेणे किंवा (असंरक्षित नसल्यास) पुन्हा अशी लस टोचून घेणे हे त्यांचे कर्तव्य असेल :

परंतु, एखाद्या प्रौढ इसमाच्या किंवा एखाद्या मुलाच्या बाबतीत,—

(अ) त्यास कलम ११, पोट-कलम (१) अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिअन्वये, लस टोचण्याचा परिणाम होत नसल्याबद्दलचे प्रमाणपत्र देण्यात आले असेल; अथवा

(ब) त्यास कलम १२, पोट-कलम (५) अन्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिअन्वये यशस्वी रीत्या लस टोचण्याचा परिणाम होत नसल्याबद्दलचे प्रमाणपत्र देण्यात आले असेल; अथवा

(क) त्यास अशी अधिसूचना 'राजपत्रात' प्रसिद्ध केल्याच्या तारखेच्या निकट पूर्ववर्ती सहा महिन्यांहून अधिक अगोदर नसेल अशा तारखेस या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधिअन्वये यशस्वी रीत्या लस टोचल्याबद्दल किंवा यशस्वी रीत्या पुन्हा लस टोचल्याबद्दल प्रमाणपत्र दिले असेल,—

तर यथास्थिति अशा प्रौढ इसमास किंवा मुलास पुन्हा लस टोचून घेण्याची आवश्यकता असणार नाही.

(३) देवीची लस पुन्हा टोचून घेण्याच्या कारणाकरिता जर एखादा प्रौढ इसम लस टोचणाऱ्याकडे आला असेल किंवा उक्त कारणाकरिता एखाद्या मुलास त्याजकडे नेण्यात आले असेल किंवा लस टोचणारा इसम उक्त कारणाकरिता अशा इसमाच्या किंवा मुलाच्या निवासस्थानी गेला असेल तर, अशा प्रसंगी, कलमे ११ व १३ चे उपबंध योग्य त्या फेरफारांनिशी लागू होतील. जेव्हा लस टोचणाऱ्या इसमाने एखाद्या प्रौढ इसमास किंवा मुलास पुन्हा देवीची लस टोचली असेल तेव्हा त्याने अशा इसमास किंवा यथास्थिति अशा मुलाच्या आई-बापास अथवा पालकास विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे असलेले एक पुन्हा देवीची लस टोचल्याबद्दलचे प्रमाणपत्र दिले पाहिजे.

**तुरुंगातील अपराधी व इतर इसम वगैरे, यांसाठी खास तरतूद.**

१६. कारागृह महा-निरीक्षक राज्य सरकारची मंजुरी घेऊन याबाबतीत तयार करील अशा नियमांस अधीन राहून आणि राज्य सरकार, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी, माफी देण्यास अधिकृत करील त्या माफीस अधीन राहून, यात यापुढे उल्लेख केलेल्या बाबतींपैकी कोणत्याही बाबतीत कैदेत ठेवण्यात आलेल्या प्रत्येक इसमास, म्हणजे ज्याच्या संबंधात—

(अ) एखाद्या फौजदारी न्यायालयाने मूळ शिक्षेचा भाग म्हणून एक महिन्यापेक्षा अधिक कैदेची शिक्षा दिलेली असेल ; अथवा

(ब) दंड भरण्यात कसूर केल्याबद्दल एखाद्या फौजदारी न्यायालयाने, कैदेच्या शिक्षेचा, निदेश दिला असेल आणि त्या कैदेची मुदत दंडाची रक्कम लवकर भरण्यात आली नाही तर, एक महिन्यापेक्षा अधिक होत असेल ; अथवा

(क) चांगल्या वर्तणुकीबाबत जामीन देण्यास कसूर करण्यात आल्याबद्दल एखाद्या न्यायालयाने किंवा दंडाधिकाऱ्याने कैदेच्या शिक्षेचा निदेश दिला असेल आणि त्या कैदेची मुदत, असा जामीन लवकर देण्यात येणार नाही तर एक महिन्यापेक्षा अधिक होत असेल ; अथवा

(ड) दंड प्रक्रिया संहिता, १८९८ याचे कलम ४६६ किंवा ४७१ यांपैकी कोणत्याही कलमान्वये अपराध्यास वेड्याच्या इस्पितळात स्थानबद्ध करण्याबाबत आदेश देण्यात आला असेल—

अशा प्रत्येक इसमाच्या बाबतीत, अशा इसमास, मग तो कोणत्याही वयाचा असो किंवा तो स्त्री असो वा पुरुष असो आणि त्याने संमती दिली असो वा नसो—देवीची लस टोचण्यात आली पाहिजे किंवा त्यास पुन्हा देवीची लस टोचली पाहिजे.

**सार्वजनिक लस टोचणी केंद्रात देवीची लस टोचण्यासाठी किंवा पुन्हा देवीची लस टोचण्यासाठी किंवा प्रमाणपत्रासाठी कोणतीही फी स्वीकारता कामा नये.**

१७. हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले नियम याअन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रासाठी म्हणून किंवा एखाद्या सार्वजनिक लस टोचणी केंद्रात या अधिनियमानुसार एखाद्या सार्वजनिक लस टोचक याने, देवीची लस टोचण्यासाठी म्हणून किंवा पुन्हा देवीची लस टोचण्यासाठी म्हणून केलेल्या कोणत्याही क्रियेबद्दल त्याने कोणतीही फी किंवा अन्य पारिश्रमिक हे स्वतःसाठी किंवा इतर कोणत्याही इसमासाठी म्हणून स्वीकारता किंवा घेता कामा नये किंवा अशी फी किंवा पारिश्रमिक हे स्वीकारण्याचे कबूल करता कामा नये किंवा मिळविण्याचा प्रयत्न करता कामा नये :

परंतु एखाद्या मुलाच्या आई-बापांच्या किंवा पालकाच्या किंवा एखाद्या प्रौढ इसमाच्या विनंतीवरून अशा मुलास किंवा त्या प्रौढ इसमास, सार्वजनिक लस टोचणी केंद्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी देवीची लस टोचण्यासाठी किंवा पुन्हा देवीची लस टोचण्यासाठी, सार्वजनिक लस टोचकास विहित करण्यात येईल अशा कमाल रकमेपेक्षा अधिक असणार नाही इतकी फी स्वीकारता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल.

## विभाग ४

## देवी प्रतिबंधक लस टोचल्याबद्दल नोंद करणे.

*देवी प्रतिबंधक लस टोचून घेण्याच्या आवश्यकतेबद्दल निबंधकाने नोटीस देणे.*

१८. (१) जेव्हा जेव्हा एखाद्या लस टोचणी क्षेत्रात जन्म-नोंदणी निबंधक कोणतेही मूल जन्मल्याबद्दलची नोंद करील तेव्हा तेव्हा त्याने, अशा जन्मासंबंधी माहिती देणाऱ्या इसमास ताबडतोब विहित केलेल्या नमुन्यातील एक नोटीस दिली पाहिजे आणि अशा नोटिशीबरोबर त्याने, या अधिनियमान्वये एखाद्या देवीची लस टोचणाऱ्याने जी प्रमाणपत्रे देणे आवश्यक असेल त्या प्रमाणपत्रांचे नमुने जोडले पाहिजेत.

(२) निबंधकाने विहित करण्यात आलेल्या नमुन्यात त्याने ठेवावयाच्या पुस्तकात, पोट-कलम (१) अन्वये त्याने दिलेल्या सर्व नोटिसांच्या टिप्पणांची नोंद केली पाहिजे.

*सर्व प्रमाणपत्रांच्या दुसऱ्या प्रती निबंधकाकडे पाठविणे.*

१९. (१) कलम ११ किंवा १२ अन्वये किंवा कलम १४ व कलम ११ किंवा १२ अन्वये कोणतेही प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात आल्यापासून, एकवीस दिवसांचे आत, लस टोचकाने किंवा ज्याने असे प्रमाणपत्र स्वाधीन केले असेल अशा इतर अधिकाऱ्याने उक्त प्रमाणपत्राची दुसरी प्रत,—

(अ) ज्या इसमाच्या संबंधात असे प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्या इसमाच्या जन्माच्या ठिकाणाविषयी निश्चितपणे माहिती मिळत असल्यास, अशा ठिकाणाच्या जन्म-नोंदणी निबंधकाकडे पाठविली पाहिजे ; किंवा

(ब) इतर कोणत्याही बाबतीत, अशी दुसरी प्रत ज्या ठिकाणी अशा इसमास देवीची लस टोचण्यात आली असेल किंवा ज्या ठिकाणी त्यास या कारणासाठी आणिले असेल त्या ठिकाणाच्या निबंधकाकडे पाठविली पाहिजे.

(२) पोट-कलम (१) यात उल्लेखिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्राची दुसरी प्रत मिळाल्यावर, निबंधकाने, कलम १८, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पुस्तकात अशा दुसऱ्या प्रतींची नोंद केली पाहिजे.

*निबंधकाने लस टोचणी संबंधीच्या नोंदीबरोबर जन्म-नोंदणी पुस्तकाची दुसरी प्रत ठेवणे.*

२०. प्रत्येक निबंधकाने, राज्यात त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विधीच्या उपबंधान्वये जें कोणतेही जन्म-नोंदणी पुस्तक ठेवणे त्यांचे कर्तव्य असेल अशा जन्म-नोंदणी पुस्तकाची दुसरी प्रत ठेवली पाहिजे आणि त्यात, राज्य सरकार वेळोवेळी निदेश देईल असे स्तंभ जादा दाखल केले पाहिजेत, आणि तसेच अशा पुस्तकात त्याने यथास्थिति, यशस्वीरीत्या लस टोचण्यात आल्याबद्दल किंवा लस टोचणीचा परिणाम होत नसल्याबद्दल त्यास कलम १९ अन्वये ज्या प्रमाणपत्रांच्या दुसऱ्या प्रती मिळाल्या असतील त्या प्रत्येक प्रतींची तारीख नमूद केली पाहिजे, आणि यथास्थिति अशा इसमास यशस्वीरीत्या लस टोचण्यात आली किंवा पुन्हा देवीची लस टोचण्यात आली आहे किंवा त्याजवर लस टोचणीचा परिणाम होत नाही अशा अर्थाची त्यात नोंद करण्यात आली पाहिजे.

*निबंधकाने देवीची लस टोचण्याचें तात्पुरते लांबणीवर टाकल्याबाबतचे नोंदणीपुस्तक ठेवणे.*

२१. प्रत्येक निबंधकाने, कलम ११ किंवा कलम १४ अन्वये देवीची लस टोचण्याचे तात्पुरते लांबणीवर टाकण्यात आल्याच्या बाबीचे एक नोंदणीपुस्तक, विहित करण्यात आलेल्या नमुन्यात ठेवले पाहिजे, आणि त्यात,—

(अ) ज्या इसमाच्या संबंधात तो देवीची लस टोचण्याच्या कारणासाठी अयोग्य आहे म्हणून देण्यात आलेल्या प्रमाणपत्राची दुसरी प्रत त्यास मिळाली असेल त्या प्रत्येक इसमाचे नाव ;

(ब) अशा प्रमाणपत्राची तारीख ;

(क) अयोग्यतेबाबत दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्राचे नवकरण करण्यात आले असेल तर अशा नवकरण करण्यात आलेल्या प्रत्येक प्रमाणपत्राची तारीख, कोणतीही असल्यास ; आणि

(ड) ज्या जन्म-नोंदणीपुस्तकात असा इसम जन्मल्याबद्दलची नोंद करण्यात आली असेल त्या जन्म-नोंदणीपुस्तकातील नोंदीचा क्रमांक व वर्ष, जर असेल तर,

यांची नोंद केली पाहिजे.

अधीक्षकाकडे पत्रक पाठविणे.

२२. लस टोचणी क्षेत्रातील प्रत्येक निबंधकाने, दर महिन्याच्या पहिल्या दिवशी, ज्या बाबींच्या संबंधात त्यास कलम १९ अन्वये प्रमाणपत्रांच्या दुसऱ्या प्रती मिळाल्या नसतील अशा सर्व बाबींचे, विहित केलेल्या नमुन्यातील एक पत्रक संबंधित अधीक्षकाकडे पाठविले पाहिजे.

## विभाग ५

## अपराध, शास्ति व खटले.

विवक्षित अपराधाबद्दल शिक्षा.

२३. (१) जो कोणी,—

(अ) कलम १० चा खंड (१) किंवा (२) ;

(ब) कलम ११ चे पोट-कलम (३) ;

(क) कलम १२ चे पोट-कलम (१), (३) किंवा (४) ;

(ड) कलम १४ आणि कलम ११ किंवा १२ यांचे संबंधित उपबंध ; किंवा

(ई) कलम १५ चे पोट-कलम (२) किंवा पोट-कलम (३) आणि कलम ११ चे संबंधित उपबंध ;

यांच्या कोणत्याही उपबंधांचे किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही आज्ञेचे उल्लंघन करील किंवा त्यांचे पालन करण्यात कसूर करील त्यास, दोषी ठरविण्यात आल्यानंतर, पराकाष्ठा शंभर रुपये दंडाची शिक्षा होईल आणि असे उल्लंघन किंवा कसुरी ही अशा रीतीने दोषी ठरविण्यात आल्यानंतर चालू ठेवण्यात येईल तर असे उल्लंघन किंवा कसुरी ज्या मुदतीपर्यंत चालू ठेवण्यात आली त्या मुदतीतील प्रत्येक दिवसास पराकाष्ठा पाच रुपये दंडाची आणखी शिक्षा होईल.

(२) जो कोणताही सार्वजनिक देवीची लस टोचणारा,—

(अ) कलम १७ च्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील, तर त्यास दोषी ठरविण्यात आले असता त्याने भारतीय दंड संहितेचे कलम १६१ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे समजले पाहिजे ;

(ब) कलम १९, पोट-कलम (१) च्या कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करील तर त्यास, दोषी ठरविण्यात आल्यावर, पराकाष्ठा शंभर रुपये दंडाची शिक्षा होईल.

ल असंरक्षित हे असे टत असेल ाबाबतीत रावयाची रवाई.

२४. (१) लस टोचणी अधीक्षकास त्याच्या नियंत्रणाखालील लस टोचणी क्षेत्रातील, सहा महिन्यांपेक्षा अधिक वयाचे कोणतेही मूल असंरक्षित आहे असे वाटण्यास कारण असेल तर, त्याने, अशा मुलाचे आई-बाप किंवा पालक यांस विहित केलेल्या नमुन्यात नोटीस दिली पाहिजे आणि असे आई-बाप किंवा पालक यांस, उक्त नोटिशीत निर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत मुलास लस टोचून घेण्याबद्दल फर्माविले पाहिजे.

(२) जर नोटिशीत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत, अशा मुलास अशा रीतीने लस टोचण्यात आली नाही, तर, अधीक्षकाने, तालुका दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसेल अशा, क्षेत्राधिकार असणाऱ्या कोणत्याही कार्यकारी दंडाधिकाऱ्याकडे उक्त गोष्ट कळविली पाहिजे. ज्यास असे प्रतिवृत्त मिळेल त्या दंडाधिकाऱ्यास,—

(अ) अशा आई-बापाला किंवा पालकाला, त्यांनी मुलासह त्याच्या समक्ष हजर व्हावे म्हणून, आज्ञापत्र काढून बोलाविण्याचा अधिकार आहे; किंवा

(ब) असे आई-बाप किंवा पालक यांचे कोणतेही रहाण्याचे ठिकाण नाही अशी त्याची खात्री होईल त्या बाबतीत, त्याच्या अटकेसाठी आणि त्यास स्वत:पुढे हजर करण्यासाठी अधिपत्र काढण्याचा अधिकार आहे.

जर, दंडाधिकाऱ्यास त्यास आवश्यक वाटेल अशी तपासणी किंवा चौकशी केल्यानंतर ते मूल असंरक्षित आहे असे आढळून येईल, तर, उक्त आदेशात निर्दिष्ट करण्यात येईल अशा दोन महिन्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या मुदतीत अशा मुलास देवीची लस टोचून घेण्याबद्दल निदेश देणारा आदेश देण्याचा अधिकार आहे.

(३) पोट-कलम (२) अन्वये दिलेल्या आदेशात निर्दिष्ट करण्यात आलेली मुदत संपण्याच्या वेळी त्या मुलास लस टोचून घेतली नाही किंवा ते मूल त्या वेळी लस टोचण्यास योग्य नव्हते किंवा त्या मुलावर लस टोचणीचा परिणाम होत नाही असे दर्शविण्यात आले नाही तर ज्या इसमास असा आदेश देण्यात आला असेल त्यास, जर तो असा आदेश अंमलात न आणण्याबद्दलचे वाजवी कारण दंडाधिकाऱ्यास दाखवू शकणार नाही तर, दोषी ठरविण्यात आल्यानंतर, पराकाष्ठा पन्नास रुपये दंडाची शिक्षा होईल.

(४) परंतु, जर त्या इसमास अयोग्यरीत्या त्याच्यासमोर आणले आहे असे दंडाधिकाऱ्याचे मत होईल आणि तो त्या मुलास लस टोचण्याबद्दल पोट-कलम (२) अन्वये आदेश देण्याचे नाकारील तर, त्या इसमास दंडाधिकाऱ्यापुढे हजर राहण्यामुळे झालेल्या खर्चाबद्दल आणि वेळेच्या अपव्ययाबद्दल, जी रक्कम नुकसानभरपाईदाखल देणे त्यास वाजवी वाटेल अशी रक्कम, माहिती देणाऱ्या इसमाने अशा इसमास द्यावी असा आदेश देण्याचा दंडाधिकाऱ्यास अधिकार असेल.

(५) जर कोणताही पालक किंवा आई-बाप, पोट-कलम (२) अन्वये जे मूल हजर करण्या-बद्दल त्याजवर आज्ञापत्र बजाविण्यात आले असेल ते मूल हजर करण्यात जाणूनबुजून कसूर करील तर त्यास, दोषी ठरविण्यात आल्यावर पराकाष्ठा तीन महिने मुदतीची साध्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा एक हजार रुपयेपर्यंतच्या दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(६) पोट-कलमे (१) ते (५) चे उपबंध, योग्य त्या फेरफारांसह, या अधिनियमाच्या उपबंधान्वये आवश्यक असेल अशा,—

(अ) असंरक्षित प्रौढ इसमास देवीची लस टोचण्याच्या; आणि

(ब) कोणत्याही इसमास पुन्हा देवीची लस टोचण्याच्या,

कारणास लागू होतील.

२५. लस टोचकाने यथास्थिति, कोणताही पालक, आई-बाप किंवा प्रौढ इसम यांस या अधिनियमान्वयेचे कोणतेही प्रमाणपत्र देणे आवश्यक असेल आणि असा देवीची लस टोचणारा इसम अशा रीतीने प्रमाणपत्र स्वाधीन करण्यात हयगय करीत असेल तेव्हा त्यास दोषी ठरविण्यात आल्यावर पराकाष्ठा पन्नास रुपये दंडाची शिक्षा होईल. प्रमाणपत्र स्वाधीन न करण्याबद्दल शास्ति.

२६. जो कोणी इसम, जाणूनबुजून ह्या अधिनियमान्वये, देणे आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रा-ऐवजी खोटी प्रमाणपत्र किंवा खोट्या प्रमाणपत्राच्या प्रतीवर सही करील किंवा ती तयार करील किंवा अशा प्रमाणपत्रावर सही करवून घेईल किंवा ती तयार करवून घेईल किंवा करवील, त्यास, दोषी ठरविण्यात आल्यावर पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील. खोटे प्रमाण-पत्र तयार करण्याबद्दल किंवा त्यावर सही करण्या-बद्दल शास्ति.

२७. (१) कोणत्याही इसमाने, स्वाभाविकरीत्या आलेल्या देवीची लस टोचून किंवा देवीच्या लशीचा किंवा ज्या पदार्थात लशीचा गुणधर्म असेल अशा पदार्थाचा जाणूनबुजून संपर्क करून कोणत्याही इसमामध्ये देवीचा रोग उत्पन्न करता किंवा उत्पन्न करण्याचा प्रयत्न करता किंवा कोणत्याही उपायानी कोणत्याही इसमास देवीचा रोग जाणूनबुजून उत्पन्न करता कामा नये. रोग प्रतिबंधक लस टोचण्यास प्रतिबंध.

(२) जो कोणी पोट-कलम (१) च्या उपबंधाचे उल्लंघन करील त्यास, दोषी ठरविण्यात आल्यावर, पराकाष्ठा तीन महिने मुदतीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा पराकाष्ठा दोनशे रुपये दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यास न्यायालय सक्षम असेल आणि अपराधांची दखल घेणे.

२८. (१) इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाव्यतिरिक्त कोणत्याही इतर न्यायालयाने, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये किंवा अशा अपराधाची न्यायचौकशी करता कामा नये.

(२) कोणत्याही न्यायालयाने, तालुका दंडाधिकारी, मुख्य अधीक्षक, लस टोचणी किंवा अधीक्षक, लस टोचणी याच्या आदेशान्वये किंवा त्याच्या प्राधिकारान्वये खटला दाखल करण्यात आला असल्याशिवाय या अधिनियमान्वयेच्या कोणत्याही अपराधाची दखल घेता कामा नये.

हयगय केल्याबद्दल खटला.

२९. मुलास देवीची लस टोचून घेण्यात हयगय केल्याबद्दलच्या कोणत्याही खटल्यात ह्या बाबतीत विधिअन्वये ज्या गोष्टी करणे आवश्यक असतील त्यासंबंधी नोटीस जन्म-नोंदणी निबंधकाकडून किंवा इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून प्रतिवादीस मिळाली होती, असे सिद्ध करणे आवश्यक असणार नाही, परंतु कलम ११ किंवा १२ अन्वयेची कोणतीही प्रमाणपत्रे किंवा अशा प्रमाणपत्रांची ज्यात योग्यरीत्या नोंद करण्यात आली आहे अशा जन्म-नोंदणी पुस्तकाची किंवा यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे कोणत्याही निबंधकाने देवीची लस टोचण्याचे काम स्थगित केल्याबद्दल ठेवलेल्या नोंदणीपुस्तकाची प्रत दाखल केली असता, ती त्याच्या बचावासाठी पुरेसा पुरावा असेल; परंतु अशी प्रत देवीची लस टोचण्याबाबतच्या अपात्रतेच्या संबंधातील प्रमाणपत्राचे संबंधात देवीची लस टोचण्याचे काम तहकूब करण्यासाठी जी मुदत त्यामध्ये निर्दिष्ट करण्यात आली असेल ती मुदत, अशी माहिती देण्याच्या वेळेपूर्वी संपली असेल तर, ती पुरेसा पुरावा आहे असे समजण्यात येता कामा नये.

## विभाग ६

### संकीर्ण

राज्य सरकारचा तपासणी करण्याचा अधिकार.

३०. राज्य सरकारला वेळोवेळी, आपल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कोणत्याही क्षेत्रात केलेल्या देवीची लस टोचण्याच्या व पुन्हा देवीची लस टोचण्याच्या कामावर देखरेख ठेवण्याबद्दल व त्याची तपासणी करण्याबद्दल निदेश देण्याचा आणि उक्त अधिकारी वेळोवेळी देईल अशा निदेशांचे पालन करण्याबद्दल उक्त क्षेत्राच्या मुख्य अधीक्षकास फर्मावण्याचा अधिकार आहे.

हरवलेल्या इत्यादी प्रमाणपत्रांच्या प्रमाणित प्रती देणे

३१. या अधिनियमान्वये कोणत्याही इसमाच्या स्वाधीन केलेल्या प्रमाणपत्रांपैकी कोणतेही प्रमाणपत्र हरवले असेल किंवा खराब झाले असेल त्याबाबतीत त्यास, विहित केलेली फी दिल्यावर, ज्या लस टोचकाने किंवा इतर अधिकाऱ्याने ते स्वाधीन केले असेल त्याच्याकडून प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत मिळण्याचा हक्क असेल.

नमुने, पुस्तके व नोंदणीपुस्तके यांच्या प्रती पुरविणे.

३२. मुख्य अधीक्षकाने, मागणी करण्यात आल्यावर, वेळोवेळी,—

(अ) प्रत्येक लस टोचकास या अधिनियमान्वये देणे आवश्यक असलेली प्रमाणपत्रे व ज्ञापने यांच्या नमुन्यांच्या प्रती आणि मुख्य अधीक्षक वेळोवेळी लस टोचकास ठेवण्याबद्दल फर्मावील अशी पुस्तके किंवा नोंदणीपुस्तके दिली पाहिजेत; आणि

(ब) प्रत्येक जन्म-नोंदणी निबंधकास कलम १८ अन्वये आवश्यक असलेली नोटीस व पुस्तके यांच्या आणि कलम २१ अन्वयेचे लस टोचणीचे काम तहकूब केल्याच्या नोंदणीपुस्तकांच्या प्रती पुरविल्या पाहिजेत.

३३. लस टोचणी क्षेत्रातील प्रत्येक जन्म-नोंदणी निबंधकाने, त्याने तयार केलेल्या जन्म-नोंदणीच्या कोणत्याही वार्षिक उतान्यात, त्या वर्षी देवीची लस टोचण्याची क्रिया ज्या मुलांच्या बाबतीत यशस्वीरीत्या करण्यात आली त्या मुलांची संख्या ज्यांच्या बाबतीत देवीची लस टोचण्याचे काम तहकूब करण्यात आले असेल अशा मुलांची संख्या आणि ज्यांना, त्यांचेवर देवीची लस टोचण्याचा यशस्वी परिणाम होत नाही म्हणून प्रमाणित करण्यात आले असेल त्या मुलांची संख्या दर्शविणे हे त्यांचे कर्तव्य असेल. देवीची लस टोचलेल्या मुलांची संख्या वगैरेचे वार्षिक पत्रक तयार करणे.

३४. (१) राज्य सरकारला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे आणि ते आगाऊ प्रसिद्ध करण्यात येतील या शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठी नियम करण्याचा अधिकार आहे. नियम.

(२) विशेषत: आणि उपरिनिर्दिष्ट अधिकारांच्या सामान्यतेस बाध न आणता, अशा नियमात पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींची तरतूद करण्याचा अधिकार आहे, त्या बाबी अशा :—

(अ) देवीची लस टोचण्याच्या क्षेत्रांची केंद्रात विभागणी करणे, कलम ५ अन्वये देवीची लस टोचण्याच्या केंद्राच्या हद्दी आणि सार्वजनिक देवीची लस टोचण्याच्या केंद्राच्या जागा जाहीर करणे आणि कलम ६ अन्वये सार्वजनिक लस टोचक सार्वजनिक लस टोचणी केंद्रात हजर राहील तो दिवस व तो हजर असण्याच्या वेळा जाहीर करण्याची रीत ;

(ब) एखाद्या इसमाची कलम ६ अन्वये सार्वजनिक लस टोचक म्हणून नेमणूक होण्यासाठी आवश्यक असलेली पात्रता किंवा त्यास आवश्यक असलले प्रमाणपत्र किंवा त्याने पूर्ण करावयाची शर्त ;

(क) कलम ७ अन्वये अधीक्षक व सहाय्यक अधीक्षक यांची कर्तव्ये ;

(ड) कलम ९ अन्वये लैसेन्स देण्याबद्दलची फी व तो देण्यासाठी इतर शर्ती आणि लैसेन्साचा नमुना ;

(इ) कलम ११ अन्वये स्वाधीन करावयाच्या प्रमाणपत्रांचे नमुने आणि ज्या शर्तीस अधीन राहून, मुलास देवीची लस टोचण्यात येईल त्या शर्ती ;

(फ) कलम १२ अन्वयेच्या ज्ञापनाचा व प्रमाणपत्राचा नमुना ;

(ग) कलमे १३ व १७ अन्वये सार्वजनिक लस टोचकांस द्यावयाची फी ;

(ह) या अधिनियमाचे इतर संबंधित उपबंध आणि कलमे १४ व १५ याअन्वये द्यावयाच्या प्रमाणपत्रांचे नमुने ;

(आय्) कलम १८ अन्वयेच्या नोटिशीचा व पुस्तकाचा नमुना ;

(जे) कलम २१ अन्वयेच्या नोंदणीपुस्तकाचा नमुना ;

(के) कलम २२ अन्वयेच्या पत्रकाचा नमुना ;

(ल) कलम २४ अन्वयेच्या नोटिशीचा नमुना आणि ती द्यावयाची रीत ;

(म) कलम ३१ अन्वयेच्या कोणत्याही प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रतीसाठी फी ;

(न) विहित करावयाची असेल किंवा विहित केली जाईल अशी कोणतीही इतर बाब ;

(ओ) ह्या अधिनियमाच्या उद्देशांपैकी कोणत्याही उद्देशाच्या अभिवृद्धीसाठी.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतानां एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात आला पाहिजे; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या

लगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा असा नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील आणि असा निर्णय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येईल तर असा नियम अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून यथास्थिति अशा सुधारलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा तो अंमलात येणार नाही तथापि असे कोणतेही फेरफार किंवा रद्द करणे यामुळे उक्त नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

## विभाग ७

### रद्द करणे व बचाव याबाबत उपबंध.

रद्द करणे व बचाव.

३५. नेमलेल्या दिवशी,—

(अ) मुंबई लस टोचणी अधिनियम, १८७७ ;

(ब) राज्याच्या विदर्भ क्षेत्रास लागू असलेला लस टोचणी अधिनियम, १८८० ;

(क) राज्याच्या मुंबई प्रदेशास लागू असलेला, मुंबई जिल्हा लस टोचणी अधिनियम, १८९२ ; आणि

(ड) राज्याच्या हैदराबाद प्रदेशास लागू असलेला हैदराबाद लस टोचणी अधिनियम, १९५१ ;

हे रद्द होतील :

परंतु, (उपरोक्त अधिनियम) अशा रीतीने रद्द करण्यात आल्यामुळे—

(एक) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमाचा पूर्वीचा अंमल ;

(दोन) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये, संपादन केलेला किंवा प्राप्त झालेला कोणताही हक्क किंवा विशेषाधिकार किंवा प्राप्त झालेले किंवा पत्करलेले बंधन किंवा जबाबदारी ;

(तीन) अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ति किंवा शिक्षा ; किंवा

(चार) उपरोक्त कोणताही असा हक्क, विशेषाधिकार, बंधन, जबाबदारी, शास्ति किंवा शिक्षा याबाबतची कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना ;

यास बाध येणार नाही आणि जणू हा अधिनियम संमत झाला नव्हता असे समजून अशी कोणतीही चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ति किंवा शिक्षा करता येईल :

तसेच, मागील परंतुकास अधीन राहून, अशा रीतीने रद्द केलेल्या कोणत्याही अधिनियमान्वये (केलेली कोणतीही नेमणूक किंवा प्रतिनियुक्ती, दिलेली नोटीस, देण्यात आलेले प्रमाणपत्र, ठेवलेले पुस्तक किंवा नोंदणीपुस्तक, किंवा दिलेले लैसेन्स याचा समावेश करून) केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती ही, ह्या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसेल तेथवर, ह्या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये केलेली गोष्ट किंवा केलेली कृती आहे असे समजले पाहिजे आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे किंवा केलेल्या कोणत्याही कृतीद्वारे ती रद्द करण्यात आली नसेल तर व रद्द करण्यात येईतोपर्यंत, त्याचप्रमाणे अंमलात राहील :

आणखी असे की, मुंबई जिल्हा लस टोचणी अधिनियम, १८९२ याद्वारे किंवा तदन्वये विहित केलेले व नेमलेल्या दिवशी अंमलात असलेले, नियम व नमुने हे, या अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील तेथवर, उक्त तारखेपासून संपूर्ण राज्याकरिता, यथास्थिति या अधिनियमाची कलमे १६ किंवा ३४ अन्वये केलेले नियम आहेत असे समजले पाहिजे.

(यथार्थ अनुवाद)

**वा. ना. पंडित,**

भाषा संचालक, महाराष्ट्र शासन.